# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/09/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## फसवणुक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत व्दारका नगरी काटोल येथे दिनांक १५/०९/२०२३ चे १३.२२ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– प्रदिप तुकाराम जिवतो वय ५० वर्ष, व्दारका नगरी काटोल याने नागपुर येथे जाण्याकरिता गुगल वर टॅक्सी सर्च करीत असता फिर्यादीचे मोबाईलवर टॅक्सी बुक करण्याकरिता कॉल आला असता यातील आरोपींनी फिर्यादीचे मोबाईलवर श्रीराम कार रेंटरचा वेब पोर्टल पाठविले व त्यावर क्लिक करून ॲप डाउनलोड करण्यास सांगीतले तसेच माहिती भरण्याकरिता सांगुन रजिस्टर फिस म्हणुन १५०/– रू भरण्याकरिता सांगुन रजिस्ट्रेशन होत नसल्याने फिर्यादीस स्क्रिन शॉर्ट काढुन पाठवण्यास सांगुन फिर्यादीने संपुर्ण माहिती भरण्यास फिर्यादीचे प्रथम ९९,९६०/– रू व नंतर ९८,९४०/– रू असे दोन वेळा त्याचे खात्यातुन कपात झाले असल्याने फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवी ६६ (डी) माहिती तंत्रज्ञान कायदयान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड
## पोलीस स्टेशन खापा यांची कारवाई

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मौजा न्यु एकांत लॉज येथे दिनांक १७/०९/२०२३ चे २३.३० वा. ते दिनांक १८/०९/२०२३ चे ०१.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारां कडुन माहीती मिळाली की, हॉटेल न्यु एकांत लॉज येथे अनैतीक व्यापारा करीता मुली आणलेल्या असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ यांनी रेड केली असता **आरोपी नामे– पंकज नामदेव सरीले, वय २७ वर्ष रा. चिचोली ता. पारशिवनी तसेच हॉटेल** व न्यु एकांत लॉजचा **चालक विनीत देवीदास पाटील वय २९ वर्ष रा. सावनेर वार्ड क्र. ०५** यांनी दोन्ही पिडीता वय अनुक्रमे २० वर्ष, १७ वर्षीय महिलांना वेश्या व्यवसाय चालविण्याकरीता एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी आणुन पिडीतांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत केले आहे. तसेच आरोपी नामे– **०१) सौरभ विजय तिवारी वय २३ वर्ष, रा. दहेगाव रंगारी ता. सावनेर जि. नागपुर, ०२) शितीज अनिल चौकसे वय २२ वर्ष रा. इंदोरा रोड कामठी नागपुर, ३) सुरेंद्र लिलाधर होले, वय २० वर्ष, रा. टिमकी तिनखँबा नागपुर, ४) संजय झिबल बिबरे, वय ४८ वर्ष, रा. नविन मानेगाव खापरखेडा ता. सावनेर** यांना ताब्यात घेण्यात आले. सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महिला पोलीस नायक सपना इंगोले पोस्टे खापा यांचे रीपोर्टवरून आरोपीतांविरूद्ध कलम ३६३ भादंवि सहकलम ३, ५ अनैतीक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ कादयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे पोस्टे खापा मो. नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन खापा येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोलीस उपनिरीक्षक गेडाम, सहायक फौजदार बन्सोड, पोलीस नायक संतोष परतेती, महिला पोलीस नायक सपना इंगोले, पोलीस नायक खोमेश्वर बांबल यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**